Impact Factor: 6.017
ISSN: 2278-9529

# GALAXY

## International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

**15 Years of Open Access**

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite
Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती व विकास योजना : एक अभ्यास

**राजरत्न निवृत्तीराव पवार**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी,
जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, सिडको, नांदेड.
**प्रा. डॉ.मेघराज ए. कपुरडेरीया**
मार्गदर्शक,
सहयोगी प्राध्यापक,
जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र सिडको, नांदेड.

**सारांश:**

शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या प्रत्येक योजनांचा उद्देश हा विकासापासून वंचित असणाऱ्या घटकांचे जीवनमान उंचावणे हाच असतो.पण त्या योजनांची अंमलबजावणी न होणे हाच एक मोठा अडसर आज घडलीला दिसून येते. त्यात दुर्गम भागात असणाऱ्या आदिवासी जमातीच्या विकासासाठी असणाऱ्या विविध शैक्षणिक योजना कोणत्या आहेत.ज्या योजना शैक्षणिक विकासाला सहाय्यभूत ठरतात त्या योजनांचे स्वरूप कसे आहेत.तसेच आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी असणाऱ्या योजनांची अमलबजावणी होऊन निश्चित करण्यात आलेल्या उद्दिष्टांची पूर्ती होत आहे काय? या संबंधीत योजनांचा आढावा घेऊन आजची वास्तव स्थिती काय आहे या उद्देशाला अनुसरून द्वितीय तथ्य संकलनाच्या आधारे आशय विश्लेषण पद्धतीचा वापर करून अंतिम निष्कर्षांच्या आधारे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासातील योजनांच्या अमलबजावणीसाठी काही उपायोजना मांडण्यात आली आहेत.त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधाचे महत्त्व स्पष्ट होते.

**बीजसंज्ञा : आदिवासी समुदाय, आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण, शासकीय विकास योजना व समाजकार्याची उपयुक्तता.**

**प्रस्तावना**:

समग्र सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून शिक्षण क्षेत्राकडे पाहिले जाते. शिक्षणाबरोबरच कौशल्य विकास हे सूत्र आज दृढ होताना दिसून येते. दिवसेंदिवस दिवस शिक्षण क्षेत्रामध्ये नवनवीन तंत्रज्ञान आणि नवनवीन अभ्यासक्रम निर्माण होत आहेत. यामध्ये शिक्षणाचा पाया मजबूत असल्याशिवाय कोणतेही उच्च शिक्षणाचे मार्ग यशस्वी होणार नाहीत.त्यामुळे प्राथमिक शिक्षण हेच उद्याच्या उच्च शिक्षणाचा मजबूत आधार असतो. म्हणून प्राथमिक शिक्षण आणि त्या शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांमध्ये विविध कला कौशल्य विकसित होऊन त्यांची शिक्षणासंदर्भातील प्राथमिक संकल्पना स्पष्ट व्हाव्या लागतात. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या प्रवाहामध्ये सामावून घेत असताना शैक्षणिक विकासात अमुलाग्र ठरणाऱ्या उपायोजना राबवणे तेवढेच महत्त्वाचे ठरते. आज घडीला दुर्गम भागातून, खेड्यापाड्यातून, डोंगराळ परिसरातून शिक्षणाचे धडे घेत असणाऱ्या दुर्लक्षित आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात योजना कोणकोणत्या आहेत काय

आहेत त्या योजनांचा वापर करून विद्यार्थी आपली शैक्षणिक प्रगती साधत आहेत काय. शासन स्तरावरून राबविण्यात येणाऱ्या योजना  विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात कितपत फलदायी ठरत आहेत याबरोबरच शैक्षणिक विकासात आजच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत योजनांची काय वस्तूस्थिती आहे. या संपूर्ण बाबींचा लेखाजोखा स्पष्ट करत असताना आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात योजनांची महत्वाची भूमिका आहे. त्यामुळे दर्जेदार शिक्षण ही शैक्षणिक विकासातील मोठी गरज निर्माण होताना दिसून येते. "राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकांची संस्कृती व त्यांची मूल्ये यांचा आदर राखून त्यांना सक्षम बनवून त्यांचा विकास सुनिश्चित करणे. भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकाचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घेणे आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासुन संरक्षण करणे. त्याअनुषंगाने अनुसूचित जमातीच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. म समाज कल्याण विभागामधून आदिवासी विभागाची निर्मिती सन १९८३ मध्ये करण्यात आली. आदिवासी जनतेच्या विकासासाठी आदिवासी विकास विभाग विविध विकास योजना राबवित आहे. अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घेण्याची आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासुन संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय संविधानातील या मार्गदर्शक तत्वास अनुसरुन पंचवार्षिक योजनामध्ये मागासवगीयांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे.

**आदिवासींची संकल्पना आणि स्वरूप:**

जगाच्या पाठीवर भारत हे एकमेव असे राष्ट्र आहे की, ज्याचा बहुसांस्कृतिक इतिहास जगाच्या तुलनेत अग्रस्थानी आहे. तसेच भारताचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भारत हा विविधतेने विभागलेला असला तरीही एकात्मतेने नटलेला आहे. अशा या राष्ट्रात आदिवासींची संस्कृती आणि तिच्या प्राचीन इतिहासाचे सौंदर्यवैभव आजही जिवंत आढळून येते. त्यामुळे अशी आदिवासी संस्कृती ही नागरी संस्कृती पासून कायमच दुरावा ठेवलेला आढळून येतो. अशा नागरी संस्कृतीपासून अलिप्तता ठेवून देशातील विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील वनात विभागलेल्या या आदिवासी संस्कृतीने आपले स्वतःचे अस्तित्व आजही कायम ठेवलेले आहे. मुळात आदिवासी संस्कृतीचे जीवनमान हे निसर्गाच्या सानिध्यात  आजही आढळून येते.  दऱ्याखोऱ्यात,घनदाट जंगल, दुर्गम प्रदेश, सोयी सुविधांचा अभाव, स्वतःची भाषा,संस्कृती आणि नैसर्गिक जीवनमान स्वीकारलेल्या या आदिवासींना त्या त्या प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणून गणले जाते. एकंदरीत जल, जंगल आणि जमीन या जीवनावश्यक घटकांच्या प्रति स्वतःला समर्पित करणाऱ्या या आदिवासी समुदायांना विविध नावांनी ओळखले जाते. त्यामध्ये काहींजन त्यांना "आदिवासी म्हणजे जंगलाचे राजे' म्हणतात, कोणी त्यांना 'धरतीचे लेकरे म्हणतात. याच लोकांचा उल्लेख आदिवासी किंवा आदिम समाज म्हणून णून केला जातो. विचारवंत, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते व राज्यकर्ते यांनी सुध्दा या समाजाला विविध नावे दिलेली आहेत."

मात्र एल्विन आणि जवाहरलाल नेहरू यांनी आदिवासींना 'मुलनिवासी' म्हणून संबोधले, तर डॉ. हट यांनी या आदिवासींना 'आदिम जमाती' (Primitive Tribe) असे म्हणतात. रीसले, लॅस्सी, ग्रिसन, शूबर्न, टॅलेंट, मार्टिन, ए. व्ही. ठक्कर यांनी या लोकांना 'अगदी प्राचीन (Aboriginal) किंवा 'अगदी मुळचे रहिवासी' (Aborigines) म्हटले आहे. डॉ. घुर्ये यांनी त्यांना 'तथाकथित मुळचे रहिवासी' (So-called Aborigines) व 'मागासलेले हिंदू (Backward Hindus) असे म्हटले आहे. पण भारतीय राज्यघटनेत केलेला 'अनुसूचित जमात' (Schedule Tribes) हा उल्लेख डॉ. घुर्ये यांना मान्य आहे.”

आदिवासी समुदायाचे वास्तव्य जगाच्तील बहुतांश सर्वच भागात आदळून येते. त्या त्या राष्ट्रांमध्ये त्या त्या त्यांना नावाने ओळख असणे हे एक वैशिष्ट्य आहे. ज्याप्रमाणे ऑस्टेलियात यांना 'ऑबोरीजन्स' म्हणून ओळखले जाते तर अमेरिकेत त्यांना 'रेड इंडीयन्स' म्हणतात. युरोपियन देशात त्यांना 'जोप्सी', तर आफ्रिका व आशियायी देशात भारतासह 'आदिवासी' म्हणून संबोधले जाते.

**आदिवासी जमातीची व्याख्या**

आदिवासींना इंग्रजी मध्ये ट्रायबल ‘Tribal’ म्हणून जम्हणून उल्लेख केला जातो, त्याचबरोबर ते आदिम, रानटी टोळीवाले, आदिवासी समाज किंवा जमाती या नावानेही ओळखले जातात. भारतीय संविधानात त्यांना अनुसूचित जमाती (Scheduled Tribe) अशी ओळख प्रदान केली आहे. आदिवासी जमाती आणि समाज यासंबंधात अधिकचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी काही समाजशास्त्रज्ञ आणि मानवीवंशाचा अभ्यास करणाऱ्या तज्ज्ञांनी मांडलेल्या काही व्याख्या पुढलीलप्रमाणे-.

१. डॉ.डी.एन. मुजुमदार - यांच्या मते "आदिवासी टोळी म्हणजे सामान्यपणे एकच नाव धारण करणाऱ्या विशिष्ट भूभागावर निवास करणाऱ्या एकाच प्रकारची बोली बोलणाऱ्या,विवाहसंबंध, व्यवसाय इत्यादी बाबतीत एकाच प्रकारचे नियम पाळणाऱ्या निश्चितपणे एका विशिष्ट प्रकारची मूल्ये व विचारप्रणाली यांची जपवणूक करणाऱ्या कुटुंबांचा समूह होय."

२. जेकब आणि स्टर्न - "समान भूप्रदेश, समान भाषा, समान संस्कृती यांचा अवलंब करणाऱ्या आणि आर्थिकदृष्ट्या एकमेकांशी अत्यंत निगडीत व परस्परसंबंधित धाग्यांनी विणलेल्या खेड्यांचे एकत्र अशा वस्तीचा उल्लेख पुष्कळदा टोळी किंवा आदिवासी समाज म्हणून केला जातो."

**आदिवासींची संकल्पना आणि स्वरूप:**

जगाच्या पाठीवर भारत हे एकमेव असे राष्ट्र आहे की, ज्याचा बहुसांस्कृतिक इतिहास जगाच्या तुलनेत अग्रस्थानी आहे. तसेच भारताचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भारत हा विविधतेने विभागलेला असला तरीही एकात्मतेने नटलेला आहे. अशा या राष्ट्रात आदिवासींची संस्कृती आणि तिच्या प्राचीन इतिहासाचे सौंदर्यवैभव आजही जिवंत आढळून येते. त्यामुळे अशी आदिवासी संस्कृती ही नागरी संस्कृती पासून कायमच दुरावा ठेवलेला आढळून येतो.

मात्र एल्विन आणि जवाहरलाल नेहरू यांनी आदिवासींना 'मुलनिवासी' म्हणून संबोधले, तर डॉ. हट यांनी या आदिवासींना 'आदिम जमाती' (Primitive Tribe) असे म्हणतात. रीसले, लॅस्सी, ग्रिसन, शूबर्न, टॅलेंट, मार्टिन, ए. व्ही. ठक्कर यांनी या लोकांना 'अगदी प्राचीन (Aboriginal) किंवा 'अगदी मुळचे रहिवासी' (Aborigines) म्हटले आहे. डॉ. घुर्ये यांनी त्यांना 'तथाकथित मुळचे रहिवासी' (So-called Aborigines) व 'मागासलेले हिंदू (Backward Hindus) असे म्हटले आहे. पण भारतीय राज्यघटनेत केलेला 'अनुसूचित जमात' (Schedule Tribes) हा उल्लेख डॉ. घुर्ये यांना मान्य आहे.”

आदिवासी समुदायाचे वास्तव्य जगाच्तील बहुतांश सर्वच भागात आदळून येते. त्या त्या राष्ट्रांमध्ये  त्या त्या त्यांना नावाने ओळख असणे हे एक वैशिष्ट्य आहे.  ज्याप्रमाणे ऑस्टेलियात यांना 'ऑबोरीजन्स' म्हणून ओळखले जाते तर  अमेरिकेत त्यांना  'रेड इंडीयन्स' म्हणतात. युरोपियन देशात त्यांना 'जोप्सी', तर आफ्रिका व आशियायी देशात भारतासह 'आदिवासी' म्हणून संबोधले जाते.

**आदिवासी जमातीची वैशिष्ट्ये:**

१. **विशिष्ट भूप्रदेशः**

खरे तर प्रारंभीचे मानवी जीवन आदिवासी जमातीसारखेच होते. मात्र मानवांनी आपल्या प्रगतीच्या जोरावर ग्रामीण व शहरी असे रूपांतर केले.केले आजही आदिवासी समुदायाच्या संबंधित केवळ काही टक्के समाज शहरात आला असला तरी आजही कितीतरी दुर्गम भागात आदिवासी समुदाय वसलेला आढळून येतो. त्यापैकी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अशा या आदिवासींचा एक विशिष्ट भूप्रदेश आढळून येतो.

२. **विशिष्ट बोली भाषाः** आदिवासी समुदायातील  वेगवेगळया समूहाची  आपापली विशिष्ट अशी बोली भाषा आढळून येते. एका समूहात असलेल्या आदिवासींना एकोप्याच्या बंधनात ठेवणारा महत्वाचा दुवा म्हणजे  त्या त्या आदिवासी समूहाची असणारी त्यांनी त्यांची स्वतः निर्माण केलेली बोली भाषा होय. या भाषेच्या शब्दांमधूनच त्याचे ऋणानुबंध  बंदीस्त झालेले आढळून येतात. त्यामुळे समान बोलीभाषेतूनही त्याची सांस्कृतिक दिसून येते. म्हणून आदिवासींच्या एकूण वैशिष्ट्यामध्ये बोलीभाषेचे वैशिष्ट्यही महत्वाचे आहे.

**३. विशिष्ट संस्कृती:**

आदिवासी समुदायाला आपली स्वतःची एक विशिष्ट सांस्कृतिक परंपरा आहे. या संस्कृतीच्या अधीन आदिवासी समुदायाचे जीवनमान आढळून येते. आदिवासी समाजाने आपली संस्कृती आजही जपलेली दिसून येते.

**५. लेखन कलेचा अभाव**: आदिवासींची बोलीभाषा ही कुठेही लिपी स्वरूपात नसल्याने त्यांची संस्कृती, लोकगिते, लोककथा, म्हणी, वाकप्रचार, नृत्ये, उखाणे, कोडी या साहित्याच्या माध्यमातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे तोंडीच हस्तांतरण केले जाते. याचाच परिणाम म्हणजे आदिवासी समाजात वाङ्मय निर्मिती आढळून येत नाही. आदिवासी बोली भाषेत लेखन कलेच्या अभावामुळे कला, ज्ञान व धर्मशास्त्र इत्यादींची वाढ प्रगत समाजात जशी झाली तशी आदिम समाजात होऊ शकली नाही.

६. **आदिवासी समाजाची जीवन पध्दती**:

आदिवासी समाजाची सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था अत्यंत कार्यक्षम व मजबूत असल्याचे आढळून येते. त्यांचे रीतिरिवाज, रूढी, परंपरा, धर्मश्रध्दा इत्यादींनीच त्यांचे सामाजिक जीवन नियंत्रित झालेले असते. समान सांस्कृतिक जीवन असल्याने त्यांचे खाणे-पिणे, आचार-

**७) लघु क्षेत्रफळ:** आदिवासी जमात एका विशिष्ट भूप्रदेशात राहते व तो भूप्रदेश क्षेत्रफळाच्या दृष्टीने लहान असतो तसेच तो दुर्गम भागात आढळून येतो. थोड्याच लोकांचा तो समुदाय असतो. ज्या भूप्रदेशावर आदिवासी राहतात, तो भूप्रदेश मर्यादित असल्याने त्यांच्या सामाजिक संपर्काचे क्षेत्रही तितकेच लहान असते. विशिष्ट भूप्रदेश, मर्यादित लोकसंख्या, दुर्गम भागातील रस्त्यांचा अभाव इत्यादी मुळे त्यांच्या सामाजिक संपर्कावरही मर्यादा पडतात.

अशाप्रकारे भारतीय समाज व्यवस्थेत असणाऱ्या दुर्गम भागातील खेडे पाड्यातील डोंगराळ वस्तीत विभागलेल्या आदिवासी समुदायाच्या संबंधित त्यांची जीवन पद्धती आणि एकूणच त्यांच्या स्वरूपाचे वर्णन वरील प्रमाणे करता येते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१)आदिवासी विद्यार्थ्यांसाठीं असणाऱ्या विविध शैक्षणिक योजनांचा अभ्यास करणे

२)आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्यात समाजकार्याची उपयुक्तता अभ्यासणे

**गृहीतकृत्ये:**

१) आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती अभ्यासणे

२) आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासातील योजनांची फारसी अमलबजावणी होताना दिसून येते नाही

**आदिवासी विद्यार्थ्याच्या शैक्षणिक विकास सहाय्यभूत ठरणाऱ्या योजना :**

आदिवासी समाजा विकासापासून दुर्लक्षित आहे .आजही त्यांच्यामध्ये त्यांच्यामध्ये विविध प्रकारच्या मूलभूत समस्यांसाठी आटापिटा चालू आहे. त्यातच शैक्षणिक उदासीनता हे एक महत्त्वाची कारण त्यांच्या एकूण विकासाच्या बाबतीत शैक्षणिक कारण हे महत्त्वाचे कारण मानले जाते. त्यामुळे या समाजामध्ये सर्व प्रकारचे परिवर्तन घडून आणत असताना त्यांच्यासाठी शासनामार्फत असणाऱ्या योजनांची अंमलबजावणी होऊन त्या योजना दुर्गम भागात, डोंगराळ भागात त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या काही योजना पुढीलप्रमाणे आहेत.

**१) शासकीय आश्रमशाळा समूह योजना:**

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण असणारी योजना म्हणजे शासकीय आश्रम शाळा समूह योजना आहे या योजनेच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या बाबतीमध्ये विविध प्रकारच्या सेवा सुविधा देण्यात .अनुसूचित जमातीमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने राज्याच्या आदिवासी भागात निवासी आश्रमशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. आश्रमशाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या आदिवात्ती विद्यार्थ्यांना भोजन, नियात्त, रालेय गणवेश, शैक्षणिक साहित्य व उपकरणे आणि इतर सुविधा मोफत पुरविल्या जातात. रेनकोट/ छत्री, स्वेटर, अंतर्वस्त्र, आंघोळीचा साबण, कपडे हुण्याचा साबण, खोबरेल तेल, टूथपेस्ट, दुयबश, टॉवेल इत्यादी वस्तुंसाठी लागणाऱ्या खचांची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे घेट जमा केलं जात आहे. सद्य:स्थितीत विभागाच्या अधिनस्त ४९७ शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे १.९९ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. रान २०२५-२६ या वर्षात सदर योजनेसाठी रु.२२०१७.८० कोटी तरतुद करण्यात आली आहे.

**(२) अनुदानित आश्रमशाळा:**

दुसरी महत्त्वाची योजना म्हणजेच राज्यामध्ये आणि संबंध देशभरामध्ये विविध प्रकारच्या अनुदानित आश्रम शाळा आढळून येतात त्या आश्रम शाळेमध्ये ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संवर्धन करून त्यांना विविध प्रकारच्या सेवा सुविधा दिल्या . या शाळा म्हणजे महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकास विभागामार्फत एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळा मंजूर असून त्यापैकी ३७ प्राथमिक अनुदानित आश्रमशाळा व ५१९ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्य जातात. सदर ५१९ माध्यमिक आश्रमशाळांपैकी २०० आश्रमशाळांमध्ये कनिष्ठ महाविद्यालये चालविण्यात येतात. सद्यःस्थितीत सुरू असलेल्या ५४१ अनुदानित आश्रमशाळांनधील एकूण विद्यार्थी संख्या २.५३ लाख इतकी आहे. अनुदानित आश्रमशाळांना वेतन अनुदान परिरक्षण अनुदान, आकस्मिक खर्च अनुदान मंजूर करण्यात येते. सन २०२५२६ साठी या योजनेकरीता रु. १९५०.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे.

**(३) अनुसूचित जमातीच्या मुला मुलींसाठी शासकीय वसतिगृह:**

आदिवासी विद्यार्थी यामध्ये मुला मुलींसाठी शासकीय वसतिगृह ही आढळून येतात. ही वसतिगृह आदिवासी विद्यार्थ्यांना गाव, तालुका, जिल्हा व विभागाच्या विकाणी माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास प्रोत्सहन मिळावे म्हणून शासकीय वसतीगृह सुरु करण्यात आली आहेत. राज्यात ७९० शासकीय वसतीगृहे कार्यरत असून त्यामध्ये एकूण ५५,९७७ विद्याधींना प्रवेश देण्यात आलेला आहे. सदर बस्तीगृहामध्ये विद्यार्थना मौषता भोजन, निवास में आवश्यना शैक्षणिक साहित्य पुरवण्यात येते. सन २०१७-१८ पासून बेडोर साहित्य, मया, पुराके, शैवाणिक साहित्य इत्यादी उपलब्ध करून घेण्याकरीता वेद्यार्थ्यांच्या बैंक खात्यावर बेट निपी जमा करण्याबाबत निर्णय घेण्यास आला असून सन २०१८-१२ पासून महानगर, विभागीय आणि जिल्हास्तरावरील शासकिय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना आहाराकरीता थेट लाभ हस्तांतर (DBT) योजनेद्वारे लाभ देण्यावा निर्णय घेण्यात आलेला आहे. सन २०२५ २६ साठी या योजनेकरील क.५२३.८० कोटी तरतुद करण्यात आली आहे.

**(४) नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण:**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित शाळेमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणे या उद्देशाने सदर योजना सुरु करण्यात अली असून नामांकित शाळेमार्फत विद्यार्थ्यांना पुरविण्यात येत असलेल्या शैक्षणिक व निवासी सुविधांचा खर्च शसनामार्फत करण्यात येतो. सदर योजनेंतर्गत आजतागायत एकूण १६२ नामंकित शाळांमध्ये ४३,९५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत सदर योजनेंतर्गत शाळांचे निवड व त्यांचा दर्जा निश्चित करुन दर्जानुसार थेट शाळांना निधी वितरीत करण्याची ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सन २०२५-२६ साठी या योजनेकरता रु २३०.०० कोटी तरतुर करण्यात आली आहे.

**(५) पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयं योजना :**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये "पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सुरु केली आहे. सदर योजनेंतर्गत वसतिगृहात प्रवेश नग मिळालेल्या अनुसुचित जमातीच्या विद्याथ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी मोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा रमलका करल घेण्यासाठी थेट लाभ इस्तारारण प्रक्रियेनुसार पात्र विद्यार्थ्यांच्या लाधार सतग्म असलेल्या बैंक खात्यामध्ये रक्कम वितरीत करण्यात येत आहे. सन २०१७-१८ पर्यंत सदर योजनेंतर्गत महानगर, विभाग सार व जिल्हा स्तर या विकाणी कार्यरत शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात येत होता शासन निर्णर दि. २१३.११.२०१८ अन्यये सन २०१८-१९ पासून तालुका स्तरावरील कार्यरत शैक्षणिक संस्थांमधील विद्याथ्यांना देखील योजनेचा लाभ देण्याची सुरुवात करण्यात आलेली आहे. सदर योजनेकरीता सन २०२५२६ या आर्थिक रु. २००.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

**६) एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल:**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे, विद्यार्थी अष्टपैलू व्हावेत म्हणून शिक्षगाव्यतिरिक्त खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण व विशेष पाठयेवर शिक्षण देणे यासाठी केंद्र शासनमार्फत नवोदय विद्यालयाच्या वर्तीचर आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरावरील महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी मार्फत एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरु केले आहेत. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७५ (१) अंतर्गत वितरित होणाऱ्या अनुदानातून महाराष्ट्र राज्यात इंग्रजी माध्यमाच्या (CBSE) २९ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल मंजूर झालेल्या आहेत, यापैकी ७ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये ८०४८ वेद्यार्थी शिक्षण घेत आहेत यासाली केंद्र शासन कडून प्रति विद्यार्थी प्रतिवार्षिक रूपये ६२.५००/- प्रमाणे विद्यार्थी पटसंख्येनुसार अनुदान प्राप्त होते. सन २०१८-२०१९ पासून रु. १०६००० अनुदान अनुज्ञेय  झाले आहे. सद्यःस्थितीत १२ शाळांकरीता इमारत बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरीत २१ शाळांचे बांधकाम विविध टप्प्यांवर प्रगतीपथावर आहे. सन २०२५ २६ साठी सदर योजनेकरीता एकुण रु.१.५१ कोटी तरतुद करण्यात आली आहे.

**७) अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी अधिछात्रवृत्ती**

आदिवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत उच्च शिक्षणाचा आलेख वाढवण्यासाठी विविध प्रकारच्या अभ्यासक्रमासाठी अधिछात्रवृत्ती ही देण्यात येतात त्यात प्रामुख्याने आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था पुणे तसेच विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत दिल्या जातात. राज्यात ही योजना अदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, दि. ०३ फेब्रुवारी, २०२३ अन्वये राबविम्यात येत आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीट/ महाविद्यालय / संस्था यामध्ये कोणत्याही विषयात पूर्णविळ व नियमित पी. एच. वौः करण्यासाठी जास्तीत जास्त पाच वर्षाच्या कालावधीसाठी १०० लाभार्थ्यांना अधिछात्रवृत्ती दिली जाते. सन २०२५ २६ साठी या योजनेकरीता रु ४७.०० कोटी तरतुद करण्यात आली आहे.

**८) आदिवासी विद्याथ्यांना परदेशातील उच्च शिक्षणाकरिता शैक्षणिक शिष्यवृत्ती परदेशी:**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासनाने ही योजना सुरू केली आहे आणि दरवर्षी ४० अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. सन २०२५-२६ साठी या योजनेकरीता रु.२०.०० कोटी तरतुद करण्यात आली आहे.

अशाप्रकारे वरील योजना या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासामध्ये भर पडून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस सहाय्यभूत ठरणाऱ्या आहेत.

**आदिवासी समुदायातील शैक्षणिक स्थिती:**

भारतीय संविधान कलम ४६ मध्ये अनुसूचित जमातीच्या शैक्षणिक हितसंवर्धनाची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी असणाऱ्या योजनांची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून विविध प्रकारचे योजना आठवणी येतात. कारण प्राथमिक शिक्षण व्यक्तिमत्व विकासातील पहिली पायरी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक विकासातील जडणघडण ही प्राथमिक शिक्षणाच्या आधारावर एक विकसित होत असते.त्यामुळे दर्जेदार प्राथमिक शिक्षण ही शैक्षणिक विकासातील मोठी गरज निर्माण होताना दिसून येते. त्यामुळे अनुसूचित जमातीचे शैक्षणिक मागासलेपणा पाहताना त्यांना प्राथमिक शिक्षणापासूनच विविध प्रकारच्या योजनांच्या माध्यमातून सामाहून घेऊन शैक्षणिक विकास साधता येणे गरजेचे आहे."भारत सरकारच्या आदिवासी व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २०११ मध्ये भारताचा राष्ट्रीय साक्षरता दर ७३% होता, तर आदिवासींचा ५९% होता. २०१५-१६ साठी प्राथमिक शिक्षणात (इयत्ता पहिली ते आठवी ) अनुसूचित जमाती ( एसटी ) साठी एकूण नोंदणी प्रमाण १०३.३ आहे, माध्यमिक स्तरावर (इयत्ता नववी ते दहावी) ७४.५% आहे; वरिष्ठ माध्यमिक ( अकरावी ते बारावी ) साठी ४३.१% आहे; आणि उच्च शिक्षणात ते १४.२% आहे. पहिली ते पाचवीच्या आदिवासी मुलांमध्ये शाळा सोडण्याचे प्रमाण ३१.३%, पहिली ते आठवी दरम्यान ४८.२% आणि पहिली ते दहावीच्या दरम्यान ६२.४% आहे. हे सर्व आकडे आदिवासी समुदायांना शिक्षणाच्या क्षेत्रात आणि विस्ताराने, उपजीविका, प्रशासन, राजकीय प्रतिनिधित्व आणि नेतृत्व या क्षेत्रात अनुभवाव्या लागणाऱ्या मोठ्या कमतरतेचे प्रतिबिंबित करतात" अशा प्रकारचे एक स्वरूपात आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाच्या बाबतीत आढळून येते.

आदिवासी शैक्षणिक विधान विकासामध्ये त्यांच्यापर्यंत योजना पोहोचल्या नाही याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्यामध्ये योजना संबंधित असणारी अनभिज्ञता होय त्यामुळे याचेही कारण स्पष्ट करत असताना डॉ.बाळाजी शिंदे म्हणतात की, "शैक्षणिक योजना म्हणजे आदिवासींच्या शिक्षणाच्या पातळीत निश्चितच बदल होत असल्याचे सरकारी अहवालांमधून दिसून येत आहे. परंतु, तुलनेने गैर-जमातींमध्ये त्यांचा शैक्षणिक सहभाग खूपच कमी आहे, आदिवासी शिक्षण समृद्ध करण्यासाठी आदिवासींमध्ये आदिवासी भागातील शैक्षणिक योजनांविषयी योग्य जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. हा अभ्यास आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना राबविण्यासाठी सरकार कसे प्रयत्न करते हे अचूकपणे समजून घेण्यासाठी आहे, आज काही जमाती अंधश्रद्धा, निरक्षरता आणि गरिबीच्या समस्यांसह मुख्य प्रवाहात नाहीत. म्हणून, दुर्गम भागात अजूनही राहणाऱ्या आदिवासी जमातींपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, जिथे मूलभूत सुविधा पोहोचलेल्या नाहीत, आदिवासी भागात मूलभूत सुविधांचा अभाव आहे, त्याबद्दल टेलिव्हिजनवरून बातम्या वाचणे आणि पाहणे, आणि गेल्या दशकात तुलनेने आदिवासी भागात शिक्षणाबाबत सकारात्मक बदल झाल्याचे दिवसेंदिवस योग्यरित्या दिसून येते. आदिवासी शिक्षण विकासाच्या योजनांमध्ये शिक्षण खूप उपयुक्त आहे." श्याम खंडारे व प्रफुल शामराव सिडाम आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाच्या संबंधातील वास्तव परिस्थिती घेऊन केलेल्या अभ्यासात असे निष्कर्ष मानले की,"आदिवासी भवितव्याबाबत सजग आहे आणि त्यांनी मुलांच्या शिक्षणाला पुर्ण पाठिंबा दर्शवला. मात्र

त्यांना सुशिक्षित करण्याच्या प्रयत्नात समाजाचा अधिक व्यापक सहभाग अपेक्षित आहे.आदिवासी समाजामध्ये आदिवासी मुली हा सर्वात दुर्लक्षित घटक असून त्यांना शिक्षण दिले जाण्याचे प्रमाणही कमी आहे. ७ ते १४ वयोगटातील २६ टक्के मुलींच्या तुलनेत खालच्या जाती आणि आदिवासी समाजातल्या ३७ टवे मुली शाळेत जात नाहीत.आर्थिक आणि समाजिक मर्यादांमुळे अनेक आदिवासी जमातीमधील पालक मुलींच्या शिक्षणाला फारसे महत्व देत नाहीत. त्यांना केवळ प्रारंभिक शिक्षण दिले जाते आणि बाहेरच्या जगापासून सुरक्षित ठेवले जाते. बहुतेकदा या मुली शेतीची कामे करतात, वनातल्या वस्तु जमा करतात आणि भावंडांचा संभाळ करतात".

एकूणच आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासामध्ये कौटुंबिक कारणे आणि त्याचबरोबर त्यांना मिळाला योजनांची माहिती नसणे हा ही एक मुख्य कारण त्यांच्या शैक्षणिक विकासाचे एक मुख्य आडमार्ग ठरू आहे. म्हणून आदिवासी विद्यालय शिक्षण विकास यामध्ये असणारा योजनांची प्रत्यक्षात अंमलबजावणी होणे ही काळाची गरज असून त्यांच्या संबंधित असणारे योजना यावेळी प्रमाणे असून त्यांची विविध प्रसार माध्यम आणि महाविद्यालय व अन्य मार्गाद्वारे प्रसार होणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष**:

शिक्षण हा असा एकमेव मार्ग आहे ज्यामुळे मानवी जीवना त बदल घडवून आणले जाऊ शकतात. यासाठी शासन स्तरावर वेगवेगळया योजना राबवल्या जातात त्यापैकीच शिक्षणाबरोबरच अन्य सेवा सुविधा पासून कोसदूर असणाऱ्या आदिवासी समाजात शैक्षणिक उदासीनता आहे. त्याचबरोबर शासन स्तरावरून राबवल्या जाणाऱ्या योजना ह्या आदिवासी समाजापर्यंत पोहोचण्यात बऱ्याच प्रमाणात दिरंगाई होते. शासन आपल्या स्तरावरून वेगवेगळया योजना राबवत असले तरीही त्याची अंमलबजावणी फारसी होताना दिसून येत नाही. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संवर्धनासाठी शासन विविध प्रकारच्या योजना राबवत असले तरीही त्या योजनांची अंमलबजावणी आज शासकीय आश्रमशाळा तसेच शासकीय आश्रशाळा तसेच अन्य शाळांमध्ये सुविधांची उणीव भासते. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला चालना देण्यासाठी शासनातर्फे राबवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती जनसामान्यात पोहोचणे गरजेचे आहे.  शिक्षण विकास साठी असणारा शिष्यवृत्ती सारखे विविध प्रकारच्या योजना आहेत पण त्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या कुटुंबापर्यंत पोहोचल्यानेच त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित केले जाऊ शकते.

**संदर्भ:**

१)आदिवासी विकास विभाग,महाराष्ट्र शासन(२०२५-२६ )माहिती पुस्तिका

२) कुलकर्णी, पी.के. (२०१२), दलितांचे व आदिवासींचे समाजशास्त्र, डायमंड पब्लिकेशन्स, पृ. १८.

३)महाराष्ट्र शासन (२०२५-२६) आदिवासी विकास विभाग कार्यक्रम अंदाजपत्रक,पृष्ठ ४-५

४)https://azimpremjiuniversity.edu.in/workshop-upc/policy-making-and-planning-in-the-public-education-system-for-adivasi-childre

५)डॉ.बालाजी शिंदे,(२०२३)भारतातील आदिवासी शिक्षणासाठी शैक्षणिक योजनांचा अभ्यास,
इंटरनॅशनल जर्नल ऑफ सायन्स अँड रिसर्च, खंड १२ अंक १०

६) डॉ. श्याम खंडारे व प्रफुल शामराव सिडाम (सप्टेंबर २०२१) आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक विकासात सर्व शिक्षा अभियानाची भुमिका, इंटरनॅशनल इंटरडिसिप्लिनरी रिसर्च जर्नल (AIIRJ),VOL-VIII अंक-IX